NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या ३४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२४ सप्टेंबर, २०२४ दुपारी १२:०० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभेची ३४ वी बैठक मंगळवार, दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर - कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>(प्रभारी अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>(प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>(प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा) | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>(प्रभारी अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा) | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे<br>प्र. वित्त व लेखा अधिकारी | सदस्य | उपस्थित |
| ९) | प्रा. डॉ. विकास बाबुराव पाटील<br>प्र. संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. नलिनी टेंभेकर<br>विभागीय सहसंचालक सोलापूर विभाग, सोलापूर,<br>(मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्या | उपस्थित |
| ११) | मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १२) | श्री. चंद्रकांत गोपाल गार्डी<br>प्र. संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे<br>संचालक, विद्यार्थी विकास मंडळ | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे<br>प्र.संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १५) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| १६) | प्राचार्य डॉ. शशिकांत लक्ष्मण तांबे | सदस्य | उपस्थित |
| १७) | प्राचार्य डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे | सदस्य | उपस्थित |
| १८) | प्राचार्य डॉ. सत्यजित कांतिलाल शाह | सदस्य | उपस्थित |
| १९) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| २०) | प्राचार्य डॉ. सुनिल धोंडिबा हेळकर | सदस्य | उपस्थित |
| २१) | प्राचार्य डॉ. अनंत बाळू शिंगाडे | सदस्य | उपस्थित |
| २२) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| २३) | प्राचार्य डॉ. श्रीमती विद्युलता ज्ञानेश्वर पांढरे | सदस्या | उपस्थित |
| २४) | श्री. अजिंक्यराणा राजन पाटील | सदस्य | अनुपस्थित |
| २५) | श्रीमती वैशाली जितेंद्र साठे | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २६) | श्री. सुरज बब्रुवाहन रोंगे | सदस्य | उपस्थित |
| २७) | श्री. वैभव रणजित गांधी | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| २८) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| २९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ३०) | डॉ. श्रीमती वंदना संतोष गवळी | सदस्या | उपस्थित |
| ३१) | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य | उपस्थित |
| ३२) | डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी | सदस्य | उपस्थित |
| ३३) | डॉ. विरभद्र चनबस दंडे | सदस्य | उपस्थित |
| ३४) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ३५) | डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३६) | डॉ. नितीन लहानू तळपाडे | सदस्य | उपस्थित |
| ३७) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ३८) | डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | सदस्य | उपस्थित |
| ३९) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | सदस्या | उपस्थित |
| ४०) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ४१) | डॉ. विकास दादाभाऊ कडू | सदस्य | उपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| ४२) | डॉ. श्रीमती ज्योती धमेंद्र माशाळे | सदस्या | उपस्थित |
| ४३) | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य | उपस्थित |
| ४४) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य | उपस्थित |
| ४५) | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | सदस्य | उपस्थित |
| ४६) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| ४७) | श्री. अजिंक्य तानाजी देशमुख | सदस्य | उपस्थित |
| ४८) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| ४९) | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्या | उपस्थित |
| ५०) | श्री. यतिराज चंदक्रांत होनमाने | सदस्य | उपस्थित |
| ५१) | ॲड. नीता सुरेशबाबू मंकणी | सदस्या | उपस्थित |
| ५२) | श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | सदस्या | उपस्थित |
| ५३) | श्री. संजय नामदेव साळुंखे | सदस्य | उपस्थित |
| ५४) | श्री. सुदर्शन मसु यादव | सदस्य | उपस्थित |
| ५५) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य | उपस्थित |
| ५६) | श्री. माधव धोंडोपंत देशपांडे | सदस्य | उपस्थित |
| ५७) | श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | सदस्य | उपस्थित |
| ५८) | श्री. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | सदस्य | अनुपस्थित |
| ५९) | डॉ. मंगेश मोहन वेदपाठक | सदस्य | उपस्थित |
| ६०) | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्या | उपस्थित |
| ६१) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | सदस्या | उपस्थित |
| ६२) | श्रीमती शोभा एल. बोल्ली | सदस्या | उपस्थित |
| ६३) | श्रीमती माधवी श्रीपाद पारेकर | सदस्या | उपस्थित |
| ६४) | श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी | सदस्य | उपस्थित |
| ६५) | श्री. राम सातपुते (विधानसभा सदस्य) | सदस्य | अनुपस्थित |
| ६६) | श्री. यशवंत विठ्ठल माने (विधानसभा सदस्य) | सदस्य | अनुपस्थित |
| ६७) | श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (विधानपरिषद सदस्य) | सदस्य | अनुपस्थित |
| ६८) | योगिनी घारे, कुलसचिव - सदस्य सचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

तसेच खालील सदस्यांची ही पहिलीच बैठक असल्याने मा.कुलगुरु महोदय यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | २. | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे<br>प्रभारी वित्त व लेखा अधिकारी |
| ३. | प्राचार्य डॉ. शशिकांत लक्ष्मण तांबे | ४. | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले |
| ५. | प्राचार्य डॉ. अनंत बाळू शिंगाडे | ६. | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड |
| ७. | प्राचार्य डॉ. श्रीमती विद्युलता ज्ञानेश्वर पांढरे | ८. | डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी |
| ९. | डॉ. श्रीमती ज्योती धमेंद्र माशाळे | | |

अनुपस्थिती:

अधिसभेच्या या बैठकीस डॉ. प्रशांत मारुती पवार, प्र.अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, श्रीमती वैशाली जितेंद्र साठे व श्री. वैभव रणजित गांधी यांनी दुरध्वरीद्वारे / ईमेलद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] **अधिसभेच्या दि.२८ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या ३३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: अधिसभेची ३३ वी बैठक बुधवार, दि. २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत सर्व सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२४ / २६४५, दि.२७/०३/२०२४ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.२७/०३/२०२४ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.१०/०४/२०२४ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.२८ सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या ३३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | अधिसभेच्या दि. २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या ३३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला. |

[ २ ] अधिसभेच्या दि.२८ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेली कार्यवाही विचारार्थ.

टिपणी: अधिसभेची ३३ वी बैठक बुधवार, दि.२८ फेब्रुवारी, २०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात झाली. या बैठकीचा कार्यवृत्तांत सदस्यांना पत्र क्र. पुअहोसोविसो / सनिवि / अधिसभा / २०२४ / २६४५, दि.२७/०३/२०२४ अन्वये पाठविण्यात आलेला होता. २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ मधील परिनियम १५) नुसार, अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये काही दुरुस्त्या सुचविण्याच्या असल्यास कार्यवृत्तांत पाठविल्यापासून (दि.२७/०३/२०२४ पासून) दोन आठवड्यांच्या आत म्हणजे दि.१०/०४/२०२४ पर्यंत विद्यापीठास सुचविण्यात याव्यात असे कळविण्यात आलेले होते. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत. त्यानुसार सदरचे ठराव / सूचना संबंधित विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले होते.

सबब, अधिसभेच्या दि.२८ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ).

| | |
|---|---|
| ठराव: | अधिसभेच्या दि.२८ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाहीची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. |

[ ३ ] **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३० (४) (च) नुसार, अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्यांमधून दोन सदस्यांचे व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४) अन्वये व्यवस्थापन परिषदेची रचना दिलेली असून कलम ३०(४)(च)(छ)(ज)(झ) नुसार विविध संवर्गातून व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडून देण्यासाठी निवडणूका घेण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ३०(४)(च) नुसार प्राचार्य संवर्गातून प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार (इतर) व प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे (इतर मागासवर्ग) हे व्यवस्थापन परिषदेवर निवडून आले होते.

प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार हे दि.३१/०५/२०२४ रोजी प्राचार्य पदावरुन सेवानिवृत्त झाल्याने व प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे दि.१५/०१०/२०२३ रोजी निधन झाल्याने, व्यवस्थापन परिषदेवरील प्राचार्य संवर्गातील दोन्ही पदे रिक्त झालेली आहेत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (३०)(४)(च) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

| | |
|---|---|
| कलम ३० (४) (च) | अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्यांमधून अधिसभेने निवडून द्यावयाचे दोन प्राचार्य, ज्यांपैकी एक, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग या प्रवर्गांतून निवडून आलेले आहेत अशा प्राचार्यांमधून आळीपाळीने निवडण्यात येईल; |

तरी वरील तरतुदीनुसार एक पद हे इतर (Open) व १ पद हे इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातून भरावे लागणार आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३० (४) (च) नुसार, अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्यांमधून दोन सदस्यांचे व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३० (४) (च) नुसार, अधिसभेचे सदस्य असतील अशा प्राचार्यांमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून देण्यासाठी खालील दोन सदस्यांची बिनविरोध निवड झाली.**<br>१. प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे (इतर)<br>२. प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड (इतर मागास वर्ग) |

[ ४ ] २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील नियम क्र. ६ (१६) नुसार अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे.

टिपणी: २०१९ चा एकरुप परिनियम क्र. ४ नुसार, प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेले उत्तर, २०१९ चा एकरुप परिनियम क्र.४ मधील ६ (१४) अन्वये अधिसभेच्या सदस्यांना पाठविण्यात येतील.

| | |
|---|---|
| ठराव: | प्रश्नोत्तराचा तास दुपारी ०२:५० वाजता सुरु झाला व दुपारी ०३:५० वाजता संपला. वेळेअभावी प्रश्न क्र.०४ ते ४० व त्यावरील उपप्रश्न विचारता आले नाहीत. |

[ ५ ] **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६)(क) व ३१ (यघ) नुसार, सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यतेची शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३५ (२) नुसार, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याकरिता M/s. SKVM & Company, Solapur यांची संवैधानिक लेखापरीक्षक म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली होती. M/s. SKVM & Company, Solapur यांनी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करुन लेखापरीक्षण अहवाल दिलेला आहे.

लेखापरिक्षीत लेखे, लेखापरिक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल दि.२७/०८/२०२४ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत सादर केला असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन खालीलप्रमाणे मान्यतेची शिफारस करण्यात आली.

| | |
|---|---|
| ठराव | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९४(६) (क) नुसार सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवाल स्विकारुन व मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली |

वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दि.१०/०९/२०२४ रोजीच्या झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१(यघ) नुसार, सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व पुर्तता अहवालाबाबत संदर्भात दि.२७/०८/२०२४ रोजीच्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.

तसेच संकुलाच्या जमा खर्चाचा ताळमेळ घेवून शिफारशी करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | अध्यक्ष |
| २) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य |
| ३) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य |
| ४) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ५) | प्रा. (डॉ.) गौतम सुबाना कांबळे | सदस्य |

सबब, सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यतेची शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २९(छ) नुसार अधिसभेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९४(६) (क) व ३१ (यघ) नुसार, सन २०२३-२४ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पुर्तता अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची मान्यतेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ ६ ] **विद्यापीठाचा शै. वर्षे २०२२-२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १९ वा वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६ (१) नुसार, व्यवस्थापन परिषदेने वार्षिक अहवाल स्विकारणे आणि ते अधिसभेकडे मान्यतेकरिता पाठविणे अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा १९ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. इ. जा. तांबोळी | अध्यक्ष |
| २ | प्रा. गंगाधर बिराजदार | सदस्य |
| ३ | प्रा. अप्पासाहेब डोणे | सदस्य |
| ४ | डॉ. प्रभाकर कोळेकर | सदस्य |
| ५ | प्रा. ॲड श्रीमती अर्चना जोशी | सदस्य |
| ६ | श्री. मुकतार म. शेख | सदस्य - सचिव |

सदर समितीने तयार करुन दिलेला वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१९/०४/२०२४ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.०६ नुसार विचारार्थ ठेवला असता खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. ०६ | विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १९ वा वार्षिक अहवालाबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन व्यवस्थापन परिषद सदस्यांकडून अहवालावर दि. १० मे, २०२४ पर्यंत दुरुस्त्या मागवून, प्राप्त झालेल्या दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचा सन २०२२-२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १९ वा वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेल्या १९ व्या वार्षिक अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[७] दि.२८ जुलै, २०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीतील ठराव क्र.१९ नुसार गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.

टिपणी: अधिसभेची ३१ वी बैठक दि.२८/०७/२०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला होता.

"मे २०१८ पासून आजतागायत विदयापीठाच्या विविध न्याय प्रकरणात व्यवस्थापन परिषदेच्या मंजुरी शिवाय विदयापीठाने नेमलेल्या सर्व वकिलांच्या नेमणूका रद्द करण्यात याव्यात व त्यांच्यावर व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेशिवाय केलेला सर्व खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करत आहे."

ठराव: महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाच्या २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.९ नुसार अधिसभा सदस्य डॉ. भगवान आदटराव यांनी अधिसभा समितीमध्ये विघटित करण्यात यावी असा प्रस्ताव सादर केला. त्यास श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर नियम क्र. ९ (३) नुसार ३० सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिल्याने नियम क्र.९ (४) अन्वये प्रस्ताव मतास टाकण्यात आला असता, उपस्थित दोन तृतीयांश सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिल्याने तो संमत करण्यात आला. त्यामुळे नियम क्र. ९(५) अन्वये अधिसभेने स्वत:चे समितीमध्ये विघटन करण्याचा निर्णय घेतला आणि सदर विषयी चौकशी करुन अहवाल देणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | सदस्य |
| ३. | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य |
| ४. | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य |
| ५. | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य |
| ६. | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्य |
| ७. | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य |
| ८. | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्य |

समितीने सादर केलेला अहवाल पुढील अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

तदनंतर दि.०७/११/२०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीमध्ये वरील ठरावामध्ये दुरुस्तीसह समितीची कार्यकक्षा वाढविण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव दुरुस्त करण्यात आला.

**दुरुस्त केलेला ठराव:** महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब अन्वये शासनाच्या २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र.९ नुसार अधिसभा सदस्य डॉ. भगवान आदटराव यांनी अधिसभा समितीमध्ये विघटित करण्यात यावी असा प्रस्ताव सादर केला. त्यास श्रीमती वर्षाराणी कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर नियम क्र. ९ (३) नुसार ३० सदस्यांनी हात उंचावून अनुमोदन दिल्याने नियम क्र.९ (४) अन्वये प्रस्ताव मतास टाकण्यात आला असता, उपस्थित दोन तृतीयांश सदस्यांनी प्रस्तावाच्या बाजूने मत दिल्याने तो संमत करण्यात आला. त्यामुळे नियम क्र. ९(५) अन्वये अधिसभेने स्वत:चे समितीमध्ये विघटन करण्याचा निर्णय घेतला आणि सदर विषयी चौकशी करुन अहवाल देणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | अध्यक्ष |
| २. | डॉ. शिरीष नागनाथ भोसले | सदस्य |
| ३. | श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर | सदस्य |
| ४. | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य |
| ५. | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्य |
| ६. | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | सदस्य |
| ७. | ॲड. श्रीमती सुनंदा करण भगत | सदस्य |

तसेच सदर समितीच्या कामाची व्याप्ती वाढवून सन २०२२-२३ चे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल व त्याचा पूर्तता अहवालाबाबत समितीने अभ्यास करुन अहवाल पुढील अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

वरील ठरावानुसार विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/सनिवि/२०२३/८७४०, दि.२८/१२/२०२३ अन्वये समिती सदस्यांना समिती गठीत केल्याचे व अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार डॉ. भगवान आदटराव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने खालीलप्रमाणे बैठका घेतलेला आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | दि.०३/०१/२०२४ | २. | दि.१८/०१/२०२४ | ३. | दि.३०/०१/२०२४ |
| ४. | दि.३१/०१/२०२४ | ५. | दि.२७/०६/२०२४ | ६. | दि.०४/०७/२०२४ |
| ७. | दि.१६/०७/२०२४ | ८. | दि.१६/०८/२०२४ | ९. | दि.०२/०९/२०२४ |
| १०. | दि.१२/०९/२०२४ | | | | |

वरीलप्रमाणे समितीने वेळोवेळी बैठका घेऊन दि.१२/०९/२०२४ रोजी झालेल्या बैठकीनंतर मा. कुलसचिव यांचेकडे अहवाल सादर केलेला आहे.

दि.२८ जुलै, २०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीतील ठराव क्र.१९ नुसार गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.

**ठराव:** दि.२८ जुलै, २०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीतील ठराव क्र.१९ नुसार गठीत करण्यात आलेल्या समितीने बैठक घेऊन खालील दुरुस्तीसह अहवाल पुनश्च सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

१. अहवालातील सांविधिक अधिकारी / कर्मचारी यांच्या नावांऐवजी तत्कालिन पदनामे टाकावी.

२. समितीने अहवाल दुरुस्त करुन दिल्यानंतर सदरचा अहवाल दोन महिन्यांच्या कालावधीत मा.कुलपती कार्यालयास पाठविण्यात यावा.

[ ८ ] **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालिन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विद्या परिषदेने स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०७(५) नुसार विद्यापीठ उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी सम्यक योजनेशी अनुरुप अशी वार्षिक योजना दरवर्षी तयार करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम सुरु करील आणि तो कालबध्द कार्यक्रम ज्या वर्षात उच्च शिक्षणाची नवीन महाविद्यालये किंवा परिसंस्था सुरु करावयाची असतील त्या वर्षाच्या आधीचे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी प्रसिध्द करतील अशी तरतूद आहे.

त्याअनुषंगाने मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये मा.नरेंद्र जाधव समितीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे GIS Platform चा वापर करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा बृहत आराखडा महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी शासनास सादर करणे संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १) | सर्व अकृषी विद्यापीठांनी महाविद्यालयांचे स्थळबिंदू GIS संगणक प्रणालीमध्ये भरणे | दि. २४ जून २०२४ ते दि.०३ जुलै, २०२४ |
| २) | सर्व अकृषी विद्यापीठांनी संबंधित प्राधिकरणांची मान्यता घेऊन शासनाला आराखडा सादर करणे | दि.२० जुलै, २०२४ पर्यंत |

त्याअनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये दि. २६/०६/२०२४ रोजी जाहीर निवेदन देण्यात येऊन दि.०१/०७/२०२४ पर्यंत नवीन महाविद्यालय सुरु करणे संदर्भातील व नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणेसंदर्भातील निवेदन मागविण्यात आली आहेत. दि.२६/०६/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक संकुलाचेही प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. सदर जाहीर निवेदनास व प्रस्तावास अनुसरुन प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त झालेल्या निवेदनांची छाननी करणेकामी छाननी समितीची बैठक दि.०२/०७/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा. डॉ. पी. एम. पवार, प्रभारी अधिष्ठाता यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमध्ये संपन्न झाली.

सदर बैठकीत यापूर्वी उपसचिव, महाराष्ट्र शासन यांच्य दि.०८/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा एक वर्षाचा बृहत आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा, मा.प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९/०४/२०२४

रोजी संपन्न झालेल्या अभ्यास समितीच्या बैठकीत प्रस्तुत विद्यापीठाच्या अंतर्गत सर्व अभ्यासक्रम व महाविद्यालयांच्या नोंदी अद्यावत करण्यात आल्या आहेत त्याबाबतचा आढावा घेण्यात आला.

त्याप्रमाणेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या बृहत आराखड्यातील प्रस्तावांच्या नामंजूरीमुळे नवीन महाविद्यालयाचे बिंदू ठिकाण रिक्त राहत असल्यास सदर बिंदू / ठिकाण शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या बृहत आराखड्यास समाविष्ट करुन महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा असे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांच्या दि.२२/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार टेंभूर्णी व मंगळवेढा हे स्थळबिंदू सन २०२५-२६ च्या बृहत आराखड्यात समाविष्ट करणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०७ (५) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या उच्च शिक्षणाची महाविद्यालये व परिसंस्था यांच्या ठिकाणासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक सम्यक योजनेशी अनुरुप प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा एक वर्षाचा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त झालेल्या निवेदनांची छाननी करुन तसेच दि.२२/०५/२०२४ व २४/०६/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करुन प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा बृहत आराखडा तयार करणेबाबतचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी अधिष्ठाता मंडळास सादर करण्यात आला.

सदरचा अहवाल व अनुषंगिक प्राप्त निवेदने दि.०६/०७/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७(१) नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अल्पकालीन बृहत आराखडा तयार करणेकामी प्राप्त निवेदनांची छाननी करुन तयार करण्यात आलेला अल्पकालिन बृहत आराखडा सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आला."

सदरील अल्पकालीन बृहत आराखड्यात व्यवस्थापन परिषदेने केलेली दुरुस्तीसह शिफारस विद्यापरिषदेच्या दि.०९/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेली आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत अध्यक्ष, संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, सोलापूर यांनी विधी रात्र महाविद्यालय संदर्भात व चित्रकला पदवी महाविद्यालयासंदर्भात निवेदने दि.०९/०७/२०२४ रोजी सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे प्र.प्राचार्य, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय, नातेपुते यांनी दि.०९/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये एम.एस्सी. रसायनशास्त्र, बी.ए (Physical Education), बी.एस्सी. (Botany), बी.एस्सी. (Statistics) तर प्रतापसिंह मोहिते पाटील महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयात बी.कॉम., एम.एस्सी. सुक्ष्मजीवशास्त्र, एम.एस्सी. रसायनशास्त्र संदर्भात निवेदन दिलेले आहे. प्राचार्य, महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक

(विज्ञान) विद्यालय, वरवडे, ता. माढा यांनी दि.१०/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये बी.एस्सी. विज्ञान विद्याशाखे संदर्भात निवेदन दिले आहे. सदरील निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दि.११/०७/२०२४ रोजी मा.प्र-कुलगुरु महोदय यांनी उपकुलसचिव, संलग्नता विभाग यांना भ्रमणध्वनीद्वारे उपरोक्त निवेदने आज दि.११/०७/२०२४ रोजी आयोजित केलेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमध्ये विषय सादर करणेबाबत तोंडी आदेश दिलेले आहेत. त्याअनुरोधाने अधिष्ठाता मंडळाच्या दि.११/०७/२०२४ रोजीच्या बैठकीत सादर केला असता, त्यावर अधिष्ठाता मंडळाने खालीप्रमाणे ठराव केला आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालिन बृहत आराखडा पुढील कार्यवाहीसाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली आहे."

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव केलेला आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालिन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन विद्यापरिषदेस शिफारस केलेली आहे."

उपरोक्त शिफारशींच्या अनुषंगाने विद्यापरिषदेने खालीलप्रमाणे ठराव केलेला आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालिन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस शिफारस केलेली आहे."

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेला सुधारित अल्पकालिन बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विद्यापरिषदेने स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ या सम्यक योजनेशी अनुरुप शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीचा अधिष्ठाता मंडळाने नव्याने तयार केलेल्या सुधारित अल्पकालिन बृहत आराखड्यास व्यवस्थापन परिषदेने व विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ ९ ] **कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचनानुसार कार्यवाही करण्यास व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विद्यापरिषदेने स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी: मा. कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ७६ मधील तरतुदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.३०/०८/२०२३ रोजीच्या बैठकीत अकृषी विद्यापीठाने सादर केलेल्या सन २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक आराखड्यास मान्यता दिलेली असल्याचे व महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या दि.३०/०८/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेल्या सन २०२४-२५ ते २०२८-२९ या पंचवार्षिक आराखड्यातील स्थळबिंदू शिवाय विद्यमान सन २०२५-२६ रोजीच्या वार्षिक बृहत आराखड्याकरिता शैक्षणिक संस्थांनी नवीन महाविद्यालये स्थापन करण्याकरिता इतर नवीन स्थळबिंदू सूचविले असल्यास सदरहू नवीन स्थळबिंदूंचा समावेश सन २०२५-२६ च्या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये करण्यात येऊ नये असे नमुद करुन कळविले आहे. सदरील बाब दि.१२/०७/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर केली असता त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सूचनानुसार कार्यवाही करण्यास व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस शिफारस करण्यात आली."

सबब, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचनानुसार कार्यवाही करण्यास व्यवस्थापन परिषदेने स्विकारुन, व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विद्यापरिषदेने स्विकारुन सर्वानुमते अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.११/०७/२०२४ रोजीच्या शासन पत्रान्वये सन २०२५-२६ या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये शैक्षणिक संस्थांनी नव्याने सुचविलेल्या स्थळबिंदू संदर्भातील सुचनानुसार कार्यवाही करण्यास व्यवस्थापन परिषदेने व विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

[ १० ] प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"प्रस्तुत विद्यापीठाचे विद्यापीठ गीत हे संक्षिप्त करुन सुश्राव्य पध्दतीने नव्याने ध्वनीमुद्रीत करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ ११ ] प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"प्रस्तुत विद्यापीठातील अधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालयातील विविध विषयांचे विभागप्रमुख नियुक्त करण्याची नियमावली अद्ययावत करण्याची शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. शिरीषकुमार विठ्ठल शिंदे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ १२ ] प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी खालील प्रस्ताव मांडला.

“विद्यापीठाच्या विविध समित्या व परीक्षा विषयक कामकाज याबाबतची देयके विद्यापीठाकडे सादर झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अदा करण्यात यावीत अशी शिफारस ही अधिसभा वित्त व लेखा विभागास करीत आहे.”

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी अनुमोदन दिले. त्यानुसार विद्यापीठाच्या विविध समित्या व परीक्षा विषयक कामकाज याबाबतची परिपूर्ण देयके संबंधित विभागांकडून वित्त विभागास प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अदा करण्याबाबतची कार्यवाही वित्त व लेखा विभागाने करावी असे सर्वानुमते ठरले.** |

[ १३ ] प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

“विद्यापीठात व सर्व संलग्नीत महाविद्यालयामध्ये संशोधन वाढविण्यासाठी सर्व प्रकारची ऑनलाईन जर्नस व तत्सम संसाधने “Knimbus” सारख्या मोबाईल प्लॅटफॉर्म वापरुन सर्व विद्यापीठातील व संलग्नीत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लॉग ईन व पासवर्डच्या माध्यमातून उपलब्ध करुन द्यावा. विद्यापीठातील ग्रंथालयामार्फत जर ही सेवा उपलब्ध करुन दिली तर सर्व संलग्नीत महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना या सुविधेचा फायदा मिळेल अशी शिफारस ही अधिसभा ज्ञानस्त्रोत केंद्रास करत आहे.”

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे यांनी मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची ज्ञानस्त्रोत केंद्रास शिफारस करण्यात आली.** |

[ १४ ] श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सर्व प्रकारच्या दरपत्रक निविदा (Quotation/Tender) ह्या निविदेच्या मुदतीनंतर १५ दिवसांच्या आत सदर निविदेवर कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ १५ ] श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"सध्या अस्तित्वात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील लोखंडी कमान ऐवजी बांधकामाची भव्य कमान उभारण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ १६ ] श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यात आला असून सदर योजनेमध्ये विविध प्राधिकरणातील सदस्यांचा समावेश करण्यात यावा, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ १७ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"The National Institutional Ranking Framework (NIRF) रँकिंग साठी विद्यापीठाची तयारी करण्यासाठी स्वतंत्र समिती गठीत करुन नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर तयारी करण्यात यावी. विद्यापीठाला रँकिंग मिळण्यासाठी हे आवश्यक असल्यामुळे सदर शिफारस ही अधिसभा विद्यापरिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. अजिंक्य तानाजी देशमुख यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ १८ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"पाठकोऱ्या कागदांचा (One Side Used) उपयोग विद्यापीठ प्रशासनाच्या अंतर्गत कामकाजामध्ये ग्राह्य धरण्यात यावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सुदर्शन मसु यादव यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ १९ ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"विद्यापीठ संकुले व विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थिनी व महिला शिक्षक यांच्यासाठी सॅनिटरी पॅड ऑटोमॅटिक वेंडिंग मशीन बसवण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहेत."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ २० ] डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"विद्यापीठ परिसरामध्ये Senate Gardan संकल्पना राबवावी म्हणजेच अधिसभेमधील प्रत्येक अधिसभा सदस्यांनी विद्यापीठाने नेमून दिलेल्या जागेमध्ये स्वतःचे नावाचे एक झाड लावून त्याचे संगोपन करावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ २१ ] श्री. चनसबप्पा गुंडप्पा बंकूर यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"आपल्या विद्यापीठातील कंत्राटी (Contractual) प्राध्यापकांचे करार हे किमान ११ महिन्याचे करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. चनसबप्पा गुंडप्पा बंकूर यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ २२ ] ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"आपल्या विद्यापीठातील पदवीदान (convocation) समारंभात पूर्वी सन्मानाने वापरले जाणारे बराबंदी पोशाख पुन्हा सुरू करण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सचिन मारुती गायकवाड व डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ २३ ] ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सोलापूर शहरांमध्ये नवीन दोन अभ्यासिका सुरू करण्याची शिफारस ही आधी सभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड श्रीमती सुनंदा करण भगत यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ २४ ] श्रीमती शोभा एल. बोल्ली यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"आपल्या विद्यापीठाच्या वतीने कन्नड आणि तेलुगु भाषेचे certificate courses सुरू करावेत अशी शिफारस ही अधिसभा विद्या परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्रीमती शोभा एल. बोल्ली यांनी मांडल्यानंतर त्यास श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली. |

[ २५ ] डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"युजीसीची N+२ नियमावली व NEP-२०२० अंमलबजावणी मुळे प्रस्तुत विद्यापीठाचे परीक्षा विषयक प्रचलित परीनियम दुरुस्त करावेत अशी शिफारस ही आधीसभा विद्या परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांच्या वतीने डॉ. राजेंद्र शंकर सूर्यवंशी यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. सिध्देश्वर बाबू स्वामी यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ २६ ] डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"विविध प्राधिकरणावरील रिक्त पदे स्थायी समितीच्या माध्यमातून तात्काळ भरावीत अशी शिफारस ही आधीसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी मांडल्यानंतर त्यास श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ २७ ] डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"PET-९ ची प्रक्रिया सुरु झाल्यापासून Ph.D. संशोधक मार्गदर्शकांकडील निर्माण झालेली रिक्त पदे आणि नवीन Ph.D. संशोधक मार्गदर्शक मान्यतांमुळे उपलब्ध असलेली रिक्त पदे PET-९ प्रक्रियेमध्ये समाविष्ट करावीत अशी शिफारस ही आधीसभा संशोधन मंडळास करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे यांनी मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. शिरीष विठ्ठल शिंदे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ २८ ] ॲड उषा नंदकुमार पवार यांनी खालील प्रस्ताव मांडला.

“विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयांचे परीक्षा विषयक विविध तक्रारी किंवा विनंती अर्ज विहित कालावधीमध्ये निकाली न काढल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारावाई करावी, अशी शिफारस ही आधिसभा परीक्षा व मूल्यमापन मंडळास करीत आहे.”

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव ॲड उषा नंदकुमार पवार यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते परीक्षा व मूल्यमापन मंडळास शिफारस करण्यात आली. |

[ २९ ] डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

“ब्रेक थ्रू रिसर्च साठी दरवर्षी किमान पाच संशोधकांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची शिफारस ही अधीसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.”

| | |
|---|---|
| ठराव: | सदरचा प्रस्ताव डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी मांडल्यानंतर त्यास श्रीमती शोभा एल. बोल्ली यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला. |

[ ३० ] डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"विविध अधिविभागातील शिक्षकांना विध्यापिथाने आयोजित केलेल्या विविध प्राधिकरणाच्या, समितीच्या व अभ्यास मंडळाच्या बैठकीवेळी उपस्थित राहिल्याबाबत त्यांना बैठक भत्ता (Seating Allounses) देण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी मांडल्यानंतर त्यास ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.** |

[ ३१ ] श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी खालील प्रस्ताव मांडला.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षा निमित्त अ.नगर येथील चौडी, मध्य प्रदेशातील महेश्वर येथील त्यांच्या कार्यास्थळी ३ दिवशीय भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात यावा आणि त्या वेळी सर्व अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य यांना विद्यापीठाणे तेथे भेट देण्याची विद्यापीठ खर्चातून सोय करावी अशी शिफारस हि अधिसभा व्यवस्थापन परिषदेश करीत आहे."

| | |
|---|---|
| ठराव: | **सदरचा प्रस्ताव श्री. संजय नामदेव साळुंखे यांच्या ऐवजी श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. मंगेश मोहन वेदपाठक यांनी अनुमोदन दिले. तथापि, तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत श्री. सुरज ज्ञानोबा मस्के यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. त्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे घेण्यात आला.** |

मा. कुलगुरु, प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून वंदे मातरम् नंतर बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

1/10/2024

कुलसचिव
सदस्य सचिव, अधिसभा

कुलगुरु
अध्यक्ष, अधिसभा